"उन्नत शेती - समृद्ध शेतकरी" मोहीमेंतर्गत प्रचलित योजनांमधील कृषि यांत्रिकीकरणाच्या कार्यक्रम अंमलबजावणीबाबत अतिरिक्त मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र.राकृवि-०३१७/प्र. क्र. १८ / राकृवियो कक्ष,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२,
दिनांक : ३१ ऑक्टोंबर, २०१७

वाचा:

१. कृषि व पदुम विभागाचा शा.नि. क्र.०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष, दि.१३.०४.२०१७
२. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. जा.क्र. अ.शे.स.शे./कृषि. यांत्रि/१७-१८/१८४/१७, दि. २/०६/२०१७
३. कृषि व पदुम विभागाचा शा.नि. क्र.०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष,दि. २९.०७.२०१७
४. कृषि व पदुम विभागाचा शासन पूरकपत्र क्र.राकृवि- ०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष, दि.२८.०९.२०१७

प्रस्तावना:

चालू वर्षापासून "उन्नत शेती - समृद्ध शेतकरी" अभियानांतर्गत कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत कृषि यांत्रिकीकरणाचा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भांकित पत्र दि. ०२/०६/२०१७ अन्वये विहित केलेल्या आहेत. त्यानुसार यांत्रिकीकरणाकरिता सर्व योजनांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी ४० % ट्रॅक्टर खरेदीस अनुदान म्हणून व ६० % निधी कृषि यंत्र व औजारांच्या खरेदीस अनुदान म्हणून विनियोगात आणण्यास मान्यता देण्यात आली होती.

त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावरील काही तालुक्यांमधील प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन, ट्रॅक्टरसाठी उपलब्ध करुन दिलेला निधी मागणी अभावी शिल्लक रहात असल्यास, सदर निधी संबंधित तालुक्यात कृषि यंत्र व औजरांसाठी विनियोगात आणण्यास यापूर्वीच संदर्भांकित शासन पूरक पत्र दि.२८.०९.२०१७ अन्वये अनुमती देण्यात आलेली आहे.

राज्यात यांत्रिकिकरणासाठी माहे एप्रिल, २०१७ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिरातीव्दारे सुमारे १.२० लाख अर्ज प्राप्त झाले आहेत व त्यापैकी ट्रॅक्टरकरिता मोठया प्रमाणात शेतकऱ्यांची मागणी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे काही तालुक्यांमध्ये यंत्र व औजारांकरिता उपलब्ध करुन दिलेला निधीपैकी लाभार्थ्यांच्या प्रतिसादा अभावी अखर्चित राहणारा निधी ट्रॅक्टरकरिता उपलब्ध करुन देण्याची मागणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून योजनेच्या आढावा बैठकीदरम्यान होत आहे. या पार्श्वभूमीवर संदर्भांकित दि. १३/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींमध्ये आवश्यक बदल करण्याबाबत शासन पुढील निर्णय घेत आहे -

शासन निर्णय:

१. ज्या तालुक्यांमध्ये कृषि यंत्र व औजारांसाठी प्राप्त झालेल्या सर्व अर्जदारांना निवडपत्र व पूर्वसंमती दिल्यानंतरही यंत्र व औजारांसाठी प्राप्त झालेला निधी पूर्णपणे खर्ची पडत नसेल तर सदर शिल्लक निधी

त्याच तालुक्यामध्ये ट्रॅक्टर खरेदी करिता अनुदान देण्यासाठी विनियोगात आणता येईल. त्याकरिता सदर शिल्लक अनुदानाच्या मर्यादेत चालू वर्षी ट्रॅक्टर खरेदीकरिता प्राप्त झालेल्या अर्जदारांना योजनेकरिता विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार अनुदान अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. ज्या तालुक्यांमध्ये यंत्र व औजारांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी काही अर्जदार शिल्लक आहेत तथापि, यापूर्वी पूर्वसंमती दिलेल्या अर्जदारांनी अनुदानासाठी विहित कालावधीत अनुदानासाठी प्रस्ताव सादर केला नसल्यास, अशा अर्जदारांना प्रस्ताव सादर करण्याची ७ दिवसांची मुदत द्यावी व सदर मर्यादेत त्यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्यास त्यांची पूर्व संमती रद्द करुन निवड यादीतील / प्रतिक्षा यादीतील पुढील पात्र सर्व शेतकऱ्यांना दि.१५ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत पूर्व संमती प्रदान करण्यात यावी. या शेतकऱ्यांकडूनही दि.३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत अनुदान वितरणाबाबत प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या पूर्वसंमती रद्द कराव्यात. ही कार्यवाही झाल्यानंतर कृषि यंत्र व औजारांसाठी निधी शिल्लक रहात असल्यास सदर निधी ट्रॅक्टर खरेदीकरिता त्याच तालुक्यातील प्रतिक्षा यादीतील शेतकऱ्यांना अनुदान अदा करण्याकामी विनियोगात आणावा.

३. ज्या तालुक्यांमध्ये यंत्र व औजारांचा निधी शिल्लक राहणार आहे तथापि, ट्रॅक्टरकरिता पुरेसे लाभार्थी उपलब्ध नसतील तर सदर निधीच्या विनियोगासाठी पुन:श्च ट्रॅक्टर तसेच यंत्र व औजारे खरेदीकरिता जाहिरात प्रसिध्द करुन निधी खर्ची टाकण्याची कार्यवाही योजनेच्या मुळ मार्गदर्शक सुचनेनुसार करावी.

४. अशाप्रकारे, परिच्छेद क्र.१ ते ३ मध्ये विहित केलेल्या प्रक्रियेव्दारे कृषि यंत्र व औजारांसाठी शिल्लक राहणारा निधी ट्रॅक्टरकरिता विनियोगात आणावा तथापि, सदर कार्यवाही संबंधित तालुक्यांतर्गत करण्यात यावी आणि सदर प्रयत्नांती देखिल तालुक्याचा निधी अखर्चित रहात असल्यास शिल्लक निधी यथास्थिती जिल्हयांतर्गत/विभागांतर्गत व राज्यस्तरावर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही अभियानाच्या मुळ मार्गदर्शक सूचनेनुसार करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०३११७२१३७९६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.10.31 17:11:28 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्य मंत्री, मंत्रालय, मुंबई

२. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. अ.मु.स. (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अ.मु.स. (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्र. स. (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे
११.कुलगुरु (सर्व कृषि विद्यापीठ), महाराष्ट्र राज्य
१२.व्यवस्थापकीय संचालक, महाबीज, अकोला.
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१४.महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
१५.जिल्हाधिकारी (सर्व)
१६.मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हा परिषद)
१७. सर्व उप सचिव (कृषि), कृषि, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. कृषि संचालक (सर्व) / कृषि सह संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९. विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
२०. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२१. प्रकल्प संचालक (आत्मा), (सर्व)
२२. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२३. महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२४.महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
२५.निवड नस्ती (कार्यासन राकृवियो).